वाचले :- १) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडी परिपत्रक क्रमांक जमीन- २०१७/प्र.क्र. ११५/ज-१अ, दिनांक २१/९/२०१७

२) मा.ना.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ मुंबई यांचेकडील याचिका क्रमांक ७०४०/२०१३ मध्ये दिनांक २१ जुन २०१८ रोजी पारीत केलेला आदेश.

---

क्र. जमीन/कावि/ 2018/33/750/308

उप विभागीय अधिकारी

जळगांव भाग यांचे कार्यालय,

जळगांव दिनांक २८/८/२०१८

## ज्ञापन

उपोद्घातातील अनुक्रमांक १ नुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ अन्वये गाव नमुना नं. ७/१२ च्या उताऱ्याच्या नमुन्यातील इतर हक्काच्या रकान्यात "लिज पेडन्स" ची नोंद घेणे तसेच अनुषंगिक बाबींची वैधता आणि अधिकार या सर्व बाबींचा विचार करून महाराष्ट्र शासनाने गाव नमुना नंबर ७/१२ च्या इतर अधिकारात नोटीस ऑफ लिस पेडन्सची नोंद घेण्यात येऊ नये याबाबत सविस्तर सुचना दिलेल्या आहेत. उपरोक्त शासन निर्णय व मा.ना.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ मुंबई यांनी दिलेले निर्णय लक्षात घेता नोटीस ऑफ लिस पेडन्सने कोणतेही अधिकार प्राप्त होत नाही ही बाब अधोरेखीत केली आहे. यासंबंधात सदरचे परिपत्रकानुसार यापुर्वीच्या नोंदीसंबंधात सदरचे परिपत्रक लागु करावयाचे किंवा नाही यासंबंधात उपोद्घातातील अनुक्रमांक २ मध्ये दाखल केलेल्या याचिकेतील निर्णयानुसार देखील सदरचे शासन परिपत्रक योग्य व कायदेशीर असल्याची बाबीचा निवाडा मा.ना.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ मुंबई यांनी याचिका क्रमांक ७०४०/२०१३ व ८०४२/२०१४ हया दोन्ही निवाडयामध्ये संपुर्ण निर्देश दिलेले आहे. परंतु असे असतांना इकडील न्यायालयामध्ये अजुनही नोटीस ऑफ लिस पेडन्सच्या संबंधात शेतकरी त्यांचे विधिज्ञांमार्फत नोटीस ऑफ लिस पेडन्सची नोंद रद्द करणेकामी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५७ च्या अनुषंगाने पुनरीक्षण दाखल करून सदरची नोंद रद्दबातल ठरविणेची मागणी करत असतात. वास्तविक पाहता सदरचे दिनांक २१/९/२०१७ चे परिपत्रक तलाठी व संबंधित मंडळाधिकारी यांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. या ज्ञापनाव्दारे आपणास कळविण्यात येते की, जळगांव व जामनेर या दोन्ही तालुक्यात यापुर्वी झालेल्या सर्व नोटीस ऑफ लिस पेडन्सच्या नोंदी रद्दबातल करणेची कार्यवाही संबंधित मंडळाधिकारी यांनी करणे आवश्यक आहे. यासंबंधात आगामी तलाठी बैठकीमध्ये हया ज्ञापनाचे वाचन करून सर्व तलाठी यांचेसमक्ष त्यांना विदीत करावे. यापुढे नोटीस ऑफ लिस पेडन्सची नोंद देखील घेणेत येऊ नये अशा सुचना सर्व तलाठी व मंडळाधिकारी यांना देण्यात याव्यात.

(जितेंद्र पाटील)

उप विभागीय अधिकारी,

जळगांव भाग, जळगांव

प्रत — तहसिलदार जळगांव व जामनेर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषत.

तहसिलदार कार्यालय जामनेर

30/08/2018

4072

मं.अ/ तलाठी यांना कळवि

स्वाक्षरी ना.त./तहसिलदार